# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र.एमएसए /651 दि.12/10/2026.**

**सुचनापत्र**

बृहन्मुंबई महानगरपालिका फेलो 2026 भरती प्रक्रियेअंतर्गत 50 फेलो उमेदवार नियुक्त करण्याकरीता जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले. एकूण 2530 अर्ज प्राप्त झाले. सदर उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परिक्षा दि. 27.09.2026 रोजी घेण्यात आली. सदर परिक्षेकरीता एकूण 1555 उमेदवार उपस्थित होते. जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार प्रति पद तीन उमेदवार याप्रमाणे 151 उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात आली आहे. गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या 151 उमेदवारांना मुलाखतीसाठी MCGM Centre for Municipal Capacity Building and Research (MCMCR), Powai येथे प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेत उपस्थित राहण्याकरीता निर्देश देण्यात येत आहेत.

प्रवेश पत्रामध्ये देण्यात आलेल्या महत्वाच्या सुचनांमध्ये नमूद असलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती व छायांकित सत्यप्रती मुलाखतीकरीता सादर करणे आवश्यक असेल. सदर निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवड झालेल्या 50 उमेदवारांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात येईल.

बृहन्मुंबई महानगरपालिका फेलो 2026 भरती प्रक्रियेअंतर्गत मुलाखतीचा टप्पा पुर्ण झाल्यानंतर ऑनलाईन परिक्षेमध्ये पात्र उमेदवारांची मुलाखतदेखील घेण्यात येणार असल्याने मुलाखतीसाठी पात्र झालेल्या 151 उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षा व मुलाखतीचे एकत्रित गुण तसेच मुलाखतीस अपात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेचे गुण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येतील.

सही/12.10.2026
सुरेखा घाडगे
प्रमुख कर्मचारी अधिकारी
(सामान्य प्रशासन विभाग)

सही/12.10.2026
किशोर गांधी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग)